# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०२३

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### ठाणे जिल्ह्यातील उल्हासनगर ३ मध्यवर्ती हॉस्पिटल येथे नर्सिंग स्कूल सुरु करण्याबाबत

**(१) २३७८ (१३-०४-२०२०). श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील उल्हासनगर ३ येथील मध्यवर्ती हॉस्पिटल येथे नर्सिंग स्कूल सुरु करण्याबाबतची मागणी लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे दिनांक १६ डिसेंबर,२०१९ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे पत्र क्र प्रशामा /२०१९प्र क्र १०५/आ ३ अ दिनांक २५ एप्रिल २०१९ रोजी शासनास पाठविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास सदर ठराव राज्य शासनाच्या मान्यतेसाठी अनेक दिवसांपासून प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्या, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नर्सिंग स्कूल सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (१०-०३-२०२३) :** (१) होय.

(२), (३) व (४) दिनांक २५.०४.२०१९ च्या पत्रान्वये संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांच्याकडून पूर्वीचा प्रस्ताव दहा वर्षापूर्वीचा जुना असल्याने सुधारित प्रस्ताव मागविण्यात आला असून सदर प्रस्ताव अद्याप अप्राप्त आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील निवासी डॉक्टरांच्या प्रलंबित मागण्यांसंदर्भात

**(२) ३२७९३ (०७-०१-२०२२). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.अनिल पाटील (अमळनेर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील निवासी डॉक्टरांनी त्यांच्या प्रलंबित मागण्यासंदर्भात दिनांक १ ऑक्टोबर,२०२१ रोजी वा त्यासुमारास बेमुदत संप पुकारला आहे,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यांच्या प्रलंबित असलेल्या मागण्यांचे निवेदन मा. मुख्यमंत्री यांच्याकडे डॉक्टरांच्या मार्डच्या प्रतिनिधींनी दिनांक ०४ ऑक्टोंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यांच्या मागण्यांचे स्वरुप काय आहे व याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१३-०३-२०२३) :**(१) होय.
(२) होय.
(३) डॉक्टरांच्या मार्डच्या प्रतिनिधींनी दिलेल्या निवेदनातील मागण्यांच्या अनुषंगाने दि.०४/१०/२०२१ रोजी मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीमध्ये चर्चा झाली. सदर चर्चेनंतर मार्ड संघटनेने संप मागे घेतला. बैठकीत झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने शासन निर्णय दि.०६/१०/२०२१ अन्वये रू.१,२१,०००/- इतकी प्रतिकात्मक रक्कम अदा करण्यास मंजूरी दिली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**(ता.खटाव, जि.सातारा) येथे एमबीबीएस प्रवेश प्रक्रियेत झालेली अनियमितता**

**(३) ३३२४५ (०६-०१-२०२२). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) श्री छत्रपती शिवाजी शिक्षण संस्था संचालित आयएमएसआर मेडिकल कॉलेज मायनी (ता.खटाव, जि.सातारा) येथे सन २०१४-१५ या वर्षाकरीता प्रथम वर्ष एमबीबीएस प्रवेशित विद्यार्थ्यांनी कॉलेज प्रशासनाकडे भरलेले प्रत्येकी २५-३५ लाख रुपये पर्यतच्या फीस चे पैसे, झालेली नुकसान भरपाई न मिळाल्यास आत्मदहन करण्याचा ईशारा मा.मुख्यमंत्री यांना माहे डिसेंबर २०२० मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाद्वारे दिला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आर्थिक नुकसान झालेल्या विद्यार्थ्याच्या पालकांनी कॉलेज प्रशासनाकडे भरलेले पैसे परत मिळेपर्यंत सदर संस्थेस प्रथम वर्ष एमबीबीएस चे वर्ग सुरु करण्याची मान्यता देऊ नये अशी मागणीही केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मा. सर्वोच्च न्यायालयाने रीट पिटीशन (सिविल) क्र ४६९/२०१४ या न्यायालयीन प्रकरणात दि.१६/०९/२०१४ व २५/०९/२०१४ रोजी पारित केलेल्या आदेशाचे उल्लंघन करून संस्थेचे अध्यक्ष व सचिव यांनी शैक्षणिक वर्ष २०१४-१५ वर्षाच्या प्रथम एमबीबीएस अभ्यासक्रमात विद्यार्थ्याच्या प्रवेश प्रक्रियेत अनियमितता झाल्यामुळे एमसीआय, दिल्ली यांनी सर्व प्रवेश रद्द केले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,त्यानुसार पिडीत पालकांना न्याय देण्याच्या उद्देशाने संबधित दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१३-०३-२०२३) :** (१) होय.
(२) होय.
(३) होय.
(४) विद्यार्थ्यांच्या पालकांव्दारे प्राप्त झालेले दि.२१/१२/२०२० रोजीचे निवेदन शासन पत्र क्र.एमईडी १०२०/सं.क्र.२२२/२०/शिक्षण-२, दिनांक ०९/०३/२०२१ अन्वये पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना आवश्यक कार्यवाहीस्तव पाठविण्यात आलेले आहे. तसेच संचालनालयाच्या दिनांक २४/०२/२०२१ रोजीच्या पत्रान्वये सन २०१४-१५ मध्ये प्रवेशित केलेल्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क परतावा करण्याबाबतचे निर्देश देण्यासंदर्भात जिल्हाधिकारी, सातारा यांना कळविले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक आरोग्य विद्यापीठाव्दारे घेण्यात येण्या-या बीएएमएस परिक्षेचा पेपर व्हाटसॲपवर प्राप्त झाल्याबाबत.**

**(४) ३४४३० (०७-०१-२०२२). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक आरोग्य विद्यापीठाव्दारे घेण्यात येण्या-या बी.ए.एम.एस. या अभ्यासक्रमाच्या तृतीय वर्षातील बालरोग

विषयाचा पेपर परिक्षेआधिच विद्यार्थ्यांचे मोबाईलच्या व्हाटसअॅपवर प्राप्त झाला असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय
(२) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१३-०३-२०२३) :** (१) नाही.
(२) व (३) महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांना दुरध्वनीव्दारे तक्रार प्राप्त झाली. तक्रारकर्ता विद्यार्थ्याने केवळ ऐकीव माहितीवर सदर प्रश्नपत्रिका फुटली असल्याचा समज करून घेतला. त्याबाबत तक्रारकर्ता विद्यार्थी कोणतेही सबळ पुरावे सादर करू शकला नाही. झालेल्या चुकीबद्दल विद्यार्थ्याने दिलगिरी व्यक्त केली आहे. त्यामुळे परीक्षा गैरप्रकार समितीने त्याला असे प्रकार पुन्हा न करण्याविषयी समज दिली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उत्तर सोलापूर येथील बेलाटी आरोग्य उपकेंद्रावर बालकांनी पोलिओऐवजी कावीळची लस दिल्याबाबत**

**(५) ४२७४६ (२४-०४-२०२२). श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उत्तर सोलापूर येथील बेलाटी आरोग्य उपकेंद्रावर बालकांना पोलिओ ऐवजी कावीळची लस दिल्याने रिअॅक्शन झालेल्या बालकांवर उपचार सुरू असल्याचे माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार बालकांना चुकीची लस दिलेल्या संबधितावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विंलबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (१३-०३-२०२३) :** (१) दि. २१/१२/२०२१ रोजी बेलाटी येथील लसीकरण सत्रादरम्यान ७ बालकांना आयपीव्ही (IPV) ऐवजी हिपॅटायटिस बी (Hepatitis B) ची लस दिली आहे, हे खरे आहे. सदर बालकांना देखरेखीखाली चिरायु बाल रुग्णालय, सोलापूर येथे दाखल करण्यात आले होते. सदरहू ७ ही बालकांना कोणत्याही प्रकारची गुंतागुंत झालेली नाही, असे आढळून आले.
(२) सदर प्रकरणी अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर यांच्या अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय चौकशी समिती नेमून चौकशी करण्यात आली आहे.
(३) उपकेंद्राच्या आरोग्य सेविका प्राथमिकरित्या दोषी आढळल्याने त्यांना निलंबित करण्यात आले आहे. वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, तिऱ्हे यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गडचिरोली जिल्ह्यात प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत ऑनलाईन प्रणाली मधून अपात्र केलेल्या घरकुलांची फेरपडताळणी करून पात्र घरकुलांना मंजूरी देण्याबाबत**

**(६) ४८६०४ (०९-१०-२०२२). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली जिल्ह्यात प्रधानमंत्री आवास घरकुल योजनेंतर्गत गरजू, गरीब लोकांना ग्रामपंचायतीमार्फत मंजूर झालेली २२ हजार ३८२ घरकुले पंचायत समितीच्या ऑनलाईन प्रणालीद्वारा "प्रपत्र ड" च्या यादीतून वगळण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अपात्र यादीची फेर पडताळणी करून घरकुलाची पात्रता यादी बनविण्या संदर्भात वारंवार शासनाकडे पाठपुरावा व पत्रव्यवहार करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त लोकांच्या एकाच परिवारामध्ये दोन घरं आहेत अशा लोकांना घरकुल मंजूर करण्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास,उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन ऑनलाईन प्रणाली मधून अपात्र केलेल्या २२ हजार ३८२ घरकुलांची फेरपडताळणी करून पात्र घरकुलांना मंजूरी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१६-०१-२०२३) :** (१) होय.
(२) होय.
(३) नाही.
(४) राज्यातील प्रधानमंत्री आवास योजना - ग्रामीण अंतर्गत "प्रपत्र ड" मधील तांत्रिक कारणाने अपात्र ठरलेल्या लाभार्थ्यांपैकी पात्र असलेल्या लाभार्थ्यांच्या नोंदी पुन्हा करण्याकरिता लिंक उपलब्ध करुन देण्यासाठीचा सविस्तर प्रस्ताव केंद्र शासनाकडे दि.०९/०४/२०२१ व दि.१८/०५/२०२१ च्या पत्रांन्वये पाठविण्यात आला असता, केंद्र शासनाने दि.२०/०५/२०२१ च्या पत्रान्वये सदरचा प्रस्ताव अमान्य केला असून या संदर्भात पात्र लाभार्थ्यांना राज्य योजनेतून लाभ देण्याच्या सुचना केल्या आहेत.

तद्नंतर मा.लोकप्रतिनिधी कडून प्राप्त पत्राच्या अनुषंगाने तांत्रिक कारणास्तव अपात्र ठरलेल्या पात्र लाभार्थ्यांच्या नोंदी पुन्हा करण्यासाठी लिंक उपलब्ध करुन देण्याबाबतचा सविस्तर प्रस्ताव केंद्र शासनास दि.१४.०१.२०२२ च्या पत्रान्वये पुन्हा पाठविण्यात आला आहे. या संदर्भात "प्रपत्र ड" मधील म्हणजेच आवास प्लसमधील लाभार्थ्यांना लाभ देण्याविषयी आतापर्यंत कोणत्याही सूचना केंद्र शासनाच्या ग्रामीण विकास मंत्रालयाकडून अद्याप प्राप्त नाहीत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चांदवड (जि.नाशिक) तालुक्यात पाणी पुरवठा प्राधिकरण योजनेचे वॉल्व्ह मधून पाणी वाया जात असल्याबाबत

**(७) ४८६१३ (२०-०९-२०२२). श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चांदवड (जि.नाशिक) तालुक्यात ४४ गाव पाणी पुरवठा प्राधिकरण योजनेच्या निष्काळजीपणामुळे लाखो लिटर पाणी वाया जात असल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याकडे संबंधित अधिका-यांकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याने चांदवड ते मनमाड रस्त्याच्या कामामुळे मनमाड रोडवर असलेल्या पुलाजवळ शर्मा सॉ मिल वाश आउटसाठी तसेच चांदवड बस स्टॅंड जवळ एका वॉल्व्ह मधून पाणी गळती होऊन लाखो लिटर पाणी वाया जात असल्याचे निर्दशनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने याकडे दुर्लक्ष करणा-या संबंधित अधिका-यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (१७-१०-२०२२) :** (१) हे खरे नाही.
(२) अंशत: खरे आहे.

नवीन रस्त्यामुळे पाईपलाईन स्थतांतरीत करणे गरजेचे असल्याने चांदवड ते मनमाड रस्त्यावरील नव्याने टाकण्यात आलेल्या पाईपलाईन मधून माती मिश्रीत पाणी वेगळे वाहण्यासाठी Wash out Valve मधुन पाणी बाहेर काढण्यात आले होते. त्यामुळे खराब पाणी वाहुन गेले आहे. जे आवश्यक होते. त्याचप्रमाणे योजना २० वर्षे जुनी असल्यामुळे वारंवार पाणी गळती होत असते. चांदवड बस स्टॅंड जवळ असलेल्या व्हॉल्वचीही दुरुस्ती करण्यात आलेली आहे.

(३) २०२२ मध्ये चांदवड ते मनमाड या नवीन रस्त्याच्या कामामुळे पाईपलाईन स्थलांतराचे काम करण्यात येत होते. नवीन लाईन टाकण्याचे काम पुर्ण झाल्यावर त्याची चाचणी घेतल्यानंतर Wash out Valve Open करून चाचणी घेण्यात येत असतांना पाईप मधून खराब झालेले पाणी काढून टाकण्यात येत होते. तेंव्हा वॉल्व्ह मधून पाणी वाहतांना दिसत होते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ग्रामपंचायत अंतर्गत असलेल्या पथदिव्यांच्या वीज देयकाची रक्कम शासनाने भरण्याबाबत**

**(८) ४८८१३ (०७-१०-२०२२). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ग्रामपंचायत अंतर्गत असलेल्या पथदिव्यांच्या वीज देयकाची रक्कम माहे मार्च, २०२१ पर्यंत शासन स्तरावरून भरली जात होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पथदिव्यांचे वीज बिल माहे एप्रिल, २०२१ पासून ग्रामपंचायतीनेच भरावे असे शासनाकडून निर्देश देण्यात आलेले असून ग्रामपंचायतीकडे कर स्वरूपात येणारा निधी अत्यल्प असून पथदिव्यांचे वीज बिल भरता येईल असा कोणत्याही प्रकारचा निधी नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ज्या ग्रामपंचायतीने पथदिव्यांचे वीज बिल भरले नाही त्यांचा वीज पुरवठा शासनाकडून खंडित करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, गडचिरोली सारख्या नक्षलग्रस्त जिल्ह्यात असामाजिक तत्वाचे प्राबल्य असताना पथदिव्यांचे वीज खंडित केल्याने रात्रीच्यावेळी जिल्ह्यात अनुचित घटना होण्याची शक्यता वाढलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास,सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशी अंत काय आढळून आले, तदअनुषंगाने अशा अनुचित घटना घडू नये तसेच पथदिव्यांच्या वीज देयकाची रक्कम भरून वीज खंडित केलेल्या ग्रामपंचायतीचा वीज पुरवठा पूर्ववत सुरु करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२८-११-२०२२) :** (१)होय, हे खरे आहे.
(२) होय, हे अंशत: खरे आहे.
(३) हे अंशत: खरे आहे

मुलचेरा तालुक्यातील ग्रामपंचायतींच्या हद्दीतील पथदिव्यांचे वीजपुरवठा काही कालावधीकरिता महावितरण कंपनीकडून खंडीत करण्यात आला होता. विद्युत पुरवठा पूर्ववत सुरु करण्यात आलेला आहे.
(४)हे खरे नाही.
(५) ग्रामपंचायतींच्या रस्त्यांवरील पथदिव्यांच्या वीज देयकाची थकीत रक्कम भागविण्यासाठी सन २०२२-२३ या वित्तीय वर्षासाठी मंजूर अनुदान तसेच विद्युत देयकाची थकबाकी महावितरणला अदा करण्यासाठी पुरवणी मागणीद्वारे उपलब्ध निधीतून गडचिरोली जिल्हा परिषदेची रुपये ११,३९,०४,२९४/- इतकी थकीत रक्कम समायोजित करण्यासाठी महावितरणला उपलब्ध करुन देण्यात आली आहे. पुरवणी मागणीद्वारे मंजूर निधीपैकी शिल्लक निधी वितरित करण्यास वित्त विभागाने मंजूरी दिल्यास त्यामधूनही थकबाकीची रक्कम तातडीने समायोजित करण्यात येईल. याबाबत विभागाकडून पाठपुरावा करण्यात येत आहे.
६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोरची (जि. गडचिरोली) येथील बोरी-जामनारा गावाजवळ एबीज कंपनीमुळे होत असलेल्या प्रदुषणाबाबत**

**(९) ४८८२३ (०७-१०-२०२२). श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरची (जि. गडचिरोली) येथे बोरी-जामनारा गावाजवळ एबीज कंपनीच्या कोंबडी व अंडा उत्पादक कारखान्यातून बाहेर टाकण्यात येत असलेल्या घाणीतून निर्माण होणाऱ्या दुर्गंधीमुळे परिसरातील बोरी, जामनारा, गहाणेगाटा, कोहका, झगडवाही, हुडुकदुमा या आदिवासी गावातील नागरीकांना त्रास सहन करावा लागत असल्याचे माहे जून, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले, तदअनुषंगाने ईबीज कंपनी विरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२५-११-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे .

(२) प्रस्तुत प्रकरणी तहसिलदार, कोरची यांचे स्तरावर चौकशी सुरु आहे. तहसिलदार, कोरची यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ११.०५.२०२२ रोजी एबीस कंपनीचे डॉ.मलीक, कृषी तज्ञ अंसारी, कंपनीचे मॅनजेर तसेच संबंधित गावातील ग्रामसेवक, पोलिसपाटील, सरपंच, उपसरपंच व गावातील कार्यकर्ते यांच्या उपस्थितीत सभा घेण्यात आली. प्रस्तुत सभेमध्ये एबीस कंपनीच्या प्रतिनिधींनी सदर दुर्गंधी हटविण्यासंदर्भात १० ते १५ दिवसांत लेखी कळवू असे सांगितले. त्याप्रमाणे एबिस कंपनीने दिनांक.१०.०५.२००२ च्या पत्रान्वये कंपनी यापुढे श्रीमती ढेलाबाई फुलसिंग यांच्या जमीनीवर खताची साठवणूक करणार नाही, असे तहसिलदार, कोरची यांना कळविले आहे. पुढील कार्यवाही तहसिलदार, कोरची यांचे स्तरावर सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पातुर (ता.बाळापूर, जि.अकोला) शहराकरिता मंजूर सुजल पाणीपुरवठा योजना प्रलंबित असल्याबाबत**

**(१०) ४८९९१ (२०-०९-२०२२). श्री.प्रकाश भारसाकळे (अकोट), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पातुर (ता.बाळापूर, जि.अकोला) शहराकरिता शासनाने कोटयवधी रुपये खर्च करून मंजूर केलेली सुजल पाणीपुरवठा योजना अद्याप प्रलंबित असल्याचे माहे जून, २०२२ च्या पहिल्या आठवडयात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील बारा वर्षापासून सदर योजना प्रलंबित असल्याने पातुर येथील नागरीकांना पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पातुर येथील पाणी टंचाई दूर होण्याच्यादृष्टीने सदर सुजल पाणीपुरवठा योजना पुर्ण करण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (१९-१०-२०२२) :**(१) नाही. योजना कामे पुर्ण झालेली असुन योजना कार्यान्वीत करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(२) नाही. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून अस्तीत्वातील योजनेतुन पाणी पुरवठा केला जात आहे. पातुर शहरातील उंच भागात सद्य:स्थितीत पुरेशा दाबाने पाणी पुरवठा होत नसला तरी, नागरिकांना पाणी टंचाईला सामोरे जावे लागत नाही.

(३) योजनाकामे पुर्ण करण्यात आलेली असुन माहे डिसेंबर, २०२२ पर्यंत योजना कार्यान्वीत करुन शहरातील नागरिकांना सुरळीत व पुरेसा पाणी पुरवठा सुरु करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील पाणी तपासणी प्रयोगशाळा बंद असल्याबाबत

**(११) ४९०१४ (२०-०९-२०२२). श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात स्थापन झालेल्या १७० पाणी गुणवत्ता तपासणी प्रयोगशाळांमधील ८०० हून अधिक कंत्राटी कर्मचाऱ्यांना प्रशासनाने पुनर्नियुक्ती आदेश न दिल्यामुळे त्या २ मार्च पासून बंद असल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाणी तपासणी प्रयोगशाळा बंद असल्याने राज्यभरातील दुषित पाणी तपासणी बंद पडली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील प्रकरणी शासनाने आढावा घेऊन राज्यातील पाणी तपासणी प्रयोगशाळा तातडीने सुरु करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (०७-११-२०२२) :** (१) नाही.

पाणी गुणवत्ता तपासणी करीता राज्यस्तरावर १, विभागस्तरावर ६ ,जिल्हास्तरावर २८ व उपविभाग स्तरावर १४३ प्रयोगशाळा कार्यरत आहेत.

सद्यस्थितीत जल जीवन मिशन अंतर्गत पाणी गुणवत्ता सनियंत्रण व सर्वेक्षणाचे काम सुरू आहे. उपरोक्त प्रयोगशाळांकरिता मंजूर असलेली ८२० कंत्राटी मनुष्यबळ बाहयसंस्थेमार्फत घेण्याचे निर्देश शासन पत्र दि.२९.०६.२०२१ अन्वये भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा यांना दिले आहेत. तथापि, याबाबत कार्यरत कंत्राटी कर्मचारी यांनी मा. उच्च न्यायालय,औरंगाबाद येथे याचिका दाखल केली असून, सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

सद्या कार्यरत कंत्राटी कर्मचारी यांचेकडून प्रयोगशाळांचे पाणी नमुने तपासणीचे काम निरंतर सुरू आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ग्रामीण भागात दिवसा पथदिवे सुरू असल्याबाबत

**(१२) ४९०१८ (०७-१०-२०२२). श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रामीण भागात गावातील अंतर्गत रस्त्यावरील पथ दिव्यासाठी स्वतंत्र विद्युत लाईन नसल्याने पथ दिवे दिवसरात्र सुरू असल्याने विजेचा प्रचंड अपव्यय होत असल्याचे माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील भागात दिवासा सुरू असलेली पथदिवे बंद करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. ग्रामविकास मंत्री व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद लातूर यांच्याकडे माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले, तदनुसार उक्त दिवस सुरू असलेले पथदिवे बंद करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात आलेली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०९-१-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे अंशत: खरे आहे.

(३) जिल्हा परिषद स्तरावरुन दिनांक ५.७.२०२२ रोजीच्या पत्रान्वये सर्व गटविकास अधिकारी यांच्या मार्फत गावपातळीवर ग्रामसेवक यांना कार्यवाही करण्यासाठी सूचना देण्यात आलेल्या आहेत.तसेच मुख्य अभियंता, महापारेषण, लातूर परिमंडळ यांनाही सदर बाबतीत कार्यवाही करण्यास्तव सुचना देण्यात आलेल्या आहेत.

तसेच, शासन स्तरावरुनही याबाबत आवश्यक ती कार्यवाही व दक्षता घेण्याबाबत सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद यांना सूचना देण्यात येतील.
(४) प्रश्न उदभवत नाही.

---

**मौजे कळकवणे (ता.चिपळूण, जि रत्नागिरी) येथील साफ़ इस्ट कंपनी प्रा. लि. मध्ये काम करीत असलेल्या कामगारास नुकसान भरपाई देणेबाबत**

**(१३) ४९०५६ (११-१०-२०२२). श्री.शेखर निकम (चिपळूण) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे कळकवणे (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथील श्री. महेंद्र पुतळाजी शिंदे, हे साफ़ इस्ट कंपनी प्रा. लि. गाणे खड्पोली या कंपनीमध्ये काम करीत असताना सुपरवायझर यांनी निष्काळजीपणे मशिन सुरु केल्यामुळे श्री. महेंद्र शिंदे यांच्या डाव्या हाताची दोन बोटे तुटली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय.
(२) असल्यास, सदर प्रकरणी नुकसान भरपाई व सेवेत कायम करण्याची मागणी केल्यामुळे श्री. महेंद्र शिंदे यांना नोकरीतून बडतर्फ केले, हे ही खरे आहे काय.
(३) असल्यास, श्री. महेंद्र पुतळाजी शिंदे हे सध्या बेरोजगार असून त्यांच्या सर्व कुटुंबावर उपासमारीची वेळ आज्यामुळे त्यांना सेवेत कायमस्वरुपी समाविष्ट करुन तसेच नुकसान भरपाई देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (०६-०१-२०२३) :** (१) होय हे अंशत: खरे आहे.
मौजे कळकवणे (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथील श्री.महेंद्र पुतळाजी शिंदे,कंत्राटी कामगार हे साफ यीस्ट कंपनी प्रा.लि.,प्लॉट नं.सी-३, एमआयडीसी,गाणेखडपोली,ता.चिपळूण,जि.रत्नागिरी का कारखान्यात दि.०५.०१.२०१९ रोजी यीस्ट केक मिक्सर मशिनमध्ये अडकलेले यीस्ट साफ करीत असतेवेळी, श्री देशमुख,सुपरवायझर यांनी मशिन सुरू केल्याने मिक्सरच्या ब्लेडमुळे श्री.शिंदे यांच्या डाव्या हाताच्या तर्जनीचे दोन पेरे व मधल्या बोटाचे एक पेर तुटले आहे.
(२) हे खरे नाही.
(३) श्री.धनंजय शिंदे, कंत्राटदार यांचेमार्फत श्री.महेंद्र पुतळाजी शिंदे हे सदर कंपनीत कामाला होते. दि.५.१.२०२१९ रोजी झालेल्या अपघातामुळे श्री. शिंदे यांचेवर वैद्यकीय उपचार सुरू होते. वैद्यकीय उपचारानंतर श्री.शिंदे यांना व्यवस्थापनाने दि.५.३.२०१९ च्या पत्रान्वये कामावर हजर होण्याबाबत प्रत्यक्ष व लेखी कळविले होते.परंतु श्री.शिंदे हे कामावर हजर झालेले नाहीत.
आयुक्त,कामगार नुकसान भरपाई, रत्नागिरी यांचे दि.८.९.२०१९ रोजीच्या आदेशानुसार श्री.महेश शिंदे यांच्या बँक खात्यामध्ये व्याजासह रू.१,९९,७०४/- इतकी रक्कम दि.१९.१०.२०१९ जमा करण्यात आलेली आहे. तसेच कारखान्याच्या भोगवटादाराविरूध्द कारखाने अधिनियम,१९४८ व महाराष्ट्र कारखाने नियम,१९६३ अन्वये दोन खटले दाखल करण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात बालकामगारांच्या संख्येत लक्षणीय वाढ होत असल्याबाबत**

**(१४) ४९२१४ (१२-१०-२०२२). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्रीमती सीमा महेश हिंरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), डॉ.संदीप धुर्वे (अर्णी), ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.रवि राणा (बडनेरा) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ग्रामीण तसेच शहरी भागातील मुलांच्या शिक्षणावर आणि आरोग्यावर गेल्या दोन वर्षापासून आलेल्या

कोरोना महामारी आणि त्यानंतरच्या संचार बंदीचा परिणाम झाला असून शेती तसेच उद्योगधंद्यांमध्ये काम करणाऱ्या बालकामगारांच्या प्रमाणात लक्षणीय वाढ झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जालना, अहमदनगर, लातूर, वर्धा, नंदुरबार, परभणी या सहा जिल्ह्यातील बालकामगारांच्या संख्येमध्ये सन २०२० मध्ये २५५६ वरुन सन २०२१ मध्ये ३३५६ अशी वाढ झाली असून शहरी भागातही बालकामगारांच्या प्रमाणात वाढ झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शिक्षणाच्या माध्यमातून बालकामगारांना मुख्य प्रवाहात आणण्याकरिता कोणती कार्यवाही केली तसेच बालकामगार रोखण्याच्यादृष्टिने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (११-०१-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही,
जिल्हाधिकारी,अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेले कृतीदल,कामगार आयुक्त कार्यालय व स्वयंसेवी संस्थेमार्फत टाकण्यात आलेल्या नियमित धाडसत्रामध्ये ६ बालकामगार आढळून आले असून, इतर पाच जिल्हयांमध्ये मागील दोन वर्षात एकही बालकामगार आढळून आलेला नाही. मुक्त करण्यात आलेल्या ६ बालकामगारांना त्यांची काळजी,संरक्षण व शैक्षणिक पुनर्वसन करण्याकरीता त्यांना बालगृहात दाखल करण्यात आले आहे.
(३) शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दि.२३.६.२०२२ च्या शासन निर्णयानुसार मिशन झिरो ड्रॉप आऊट मोहिम राबविण्यात आली आहे. सदर मोहिमेमध्ये ३-१८ वयोगटातील शाळाबाह्य मुलांना नियमित शाळेत दाखल करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जिल्ह्यातील जलजीवन योजनेअंतर्गत झालेल्या कामांबाबत**

**(१५) ४९७३६ (२१-०१-२०२३). श्री.लहू कानडे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र आणि राज्याच्या समान निधीतून जलजीवन ही महत्वकांशी योजना हाती घेण्यात आली असून सन २०२४ पर्यंत ह्या योजनेची कामे पूर्ण करण्याची शासनाकडून सूचना केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अहमदनगर जिल्ह्यात या योजनेअंतर्गत आतापर्यंत किती पाणीपुरवठा योजनेची कामे पूर्ण झालेली आहेत,
(३) असल्यास, संबंधित योजनेची कामे झाली नसल्यास त्याची कारणे काय आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (०३-०३-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) अहमदनगर जिल्ह्यात जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत एकूण ८२९ योजना मंजूर असून, ८२९ योजनांना कार्यारंभ आदेश देण्यात आलेले आहेत. त्यापैकी १० योजना पूर्ण झालेल्या असून, उर्वरित ८१९ योजना प्रगतीपथावर आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नंदगाव (ता. तुळजापूर जि.उस्मानाबाद ) येथे शासनाने ५ लाख ५० हजार रुपये खर्च करुन उभारलेले जलशुध्दीकरण केंद्र पाच वर्षापासून बंद असल्याबाबत**

**(१६) ५०३८५ (२१-०१-२०२३). श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नंदगाव (ता. तुळजापूर जि.उस्मानाबाद ) येथे शासनाने ५ लाख ५० हजार रुपये खर्च करुन उभारलेले जलशुध्दीकरण केंद्र पाच वर्षापासून बंद असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर जलशुध्दीकरण केंद्रातून नंदगाव ग्रामस्थांना अदयापी एक थेंबही शुध्द पाणी मिळालेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार बंद असलेले जलशुध्दीकरण केंद्र सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (०२-०३-२०२३) :** (१) अंशतः खरे आहे.
माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये विद्युतपंपात बिघाड झाल्याने जलशुद्धीकरण संयंत्र बंद होते. ग्रामपंचायतीने सदरील पंपाची दुरुस्ती करून जलशुद्धीकरण संयंत्र कार्यान्वीत करण्यात आले आहे.
(२) व (३) हे खरे नाही.
ग्रामपंचायत नंदगाव, ता. तुळजापूर अंतर्गत १४ व्या वित्त आयोगांतर्गत दोन आर.ओ. प्लँट दि.११/०९/२०१८ रोजी उभारणी करण्यात आले होते. त्यावेळी दोन्ही प्लँट चालू होते. तथापि, मार्च २०१९ पासून सदर गावामध्ये पाणी टंचाई झाल्यामुळे पाण्याभावी सदरचे आर.ओ. प्लँट बंद होते व माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये विद्युतपंपात बिघाड झाल्याचे निदर्शनास आले.
उक्त आर.ओ.प्लँट बंद असल्याबबत प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिती तुळजापूर यांना चौकशी करण्याबाबत तसेच ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत नंदगांव यांना आर.ओ.प्लँट चालू करण्याबाबत सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार दोन्ही आर.ओ.प्लँट चालू करण्यात आले असून, त्याद्वारे ग्रामस्थांना व शालेय विद्यार्थ्यांना शुद्ध पाणी पुरवठा करण्यात येत आहे.
(४) दुरुस्त करण्याच्या तांत्रिक अडचणीमुळे विलंब झालेला असून, आज रोजी उक्त दोन्ही आर.ओ.प्लँट चालू असून, ग्रामस्थांना व शालेय विद्यार्थ्यांना शुद्ध पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

---

**अहमदपूर (जि.लातूर) तालुक्यातील पाणी टंचाई काळात अधिग्रहण केलेल्या विंधन विहिरींची देयके अदा करण्याबाबत**

**(१७) ५०५८६ (२१-०१-२०२३). श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदपूर (जि.लातूर) तालुक्यातील ४४ गावांत सन २०२०-२१ साली पाणीटंचाई असल्याने विंधन विहीरी शासनाकडून अधिग्रहण करण्यात येऊन त्याचे देयक देण्याविषयी गटविकास अधिकाऱ्यांनी कार्यकारी अभियंता (ल.पा) ग्रामीण पाणी पुरवठा जिल्हा परिषद, लातूर यांना अनेकदा पत्रे व स्मरणपत्रे पाठवूनही अधिग्रहण केलेली देयके अद्यापही शेतकऱ्यांना अदा करण्यात आले नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू पाणीटंचाई निवारणार्थ तालुक्यातील विहीर व बोअर मिळून एकूण ४४ गावांतील नागरिकांना शासनामार्फत विंधन विहीरी अधिग्रहण करुन पाणी पुरवण्यात आले तथापि दरम्यानच्या काळातील विद्युत मंडळाची विज बिले पण शेतकऱ्यांनी भरली असतांना आजपर्यंत त्यांना त्यांच्या हक्काची परतावा बिले मिळाली नाहीत त्यामुळे शेतकऱ्यांनी अहमदपूर पंचायत समितीला परतावा रक्कम मिळवण्यासाठी अनेकदा पाठपुरावा करुनही रक्कमेचा परतावा मिळाला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अहमदपूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांनी कार्यकारी अभियंता (ल.पा) ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, लातूर यांना दिनांक ५ जुलै, २०२१, दिनांक २३ जुलै, २०२१, दिनांक. ६ ऑक्टोबर, २०२१, दिनांक ३० मार्च, २०२२ तर जिल्हाधिकारी व कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा यांना दिनांक. १४ जुलै, २०२२ रोजी वा त्यासुमारास अधिग्रहण केलेल्या गावाची व विहीर बोअरची माहिती कळवून त्यांना रुपये पंधरा लक्ष चार हजार आठशे रुपये देण्यात यावीत अशा प्रकारचे लेखी पत्र देऊनही कार्यकारी अभियंता यांच्याकडून पंचायत समितीला अजून काहीही कळविले नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर टंचाईच्या काळात गावाला पाणी पुरवठा केलेल्या शेतकऱ्यांना अद्याप कोणताही परतावा न दिल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तदनुषंगाने पाणी टंचाई काळात अधिग्रहण केलेल्या विंधन विहिरींची देयके मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (१५-०२-२०२३) :** (१), (२), (३), (४) व (५)

अहमदपूर पंचायत समितीसह ४४ गावातील अधिग्रहित विंधन विहीरींचे देयके त्यांच्या मागणीनुसार कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, लातूर यांचे दिनांक ०५.१२.२०२२ च्या आदेशान्वये अदा करण्यात आलेली आहेत.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भगतपाडा (ता.वाडा, जि.पालघर) गावातील आखाडा ग्रामपंचायत मधील नागरीकांना गावात जाण्यासाठी नदीवर बंधारा किंवा पूल नसल्याबाबत**

**(१८) ५०७१४ (२६-१२-२०२२). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भगतपाडा (ता.वाडा, जि.पालघर) गावातील आखाडा ग्रामपंचायत मधील नागरीकांना गावात जाण्यासाठी नदीवर बंधारा किंवा पूल नसल्यामुळे नागरीकांना व रुग्णांना नदीतूनच प्रवास करावा लागत असल्याचे दिनांक १० सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू ठिकाणी रुग्णांना व विद्यार्थ्यांना खांदयावर घेऊनच नदीपार करावी लागत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप निर्माण झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले, तदनुषंगाने सदर नागरीकांना गावात जाण्यासाठी नदीवर बंधारा किंवा पूल बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१५-०२-२०२३) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) आखाडा ग्रामपंचायत ते भगतपाडा ग्रा.मा.३ या रस्त्याच्या दरम्यान पिंजाळ नदी असून सदर नदीवर २०० मीटर लांबीचा पूल बांधणे आवश्यक आहे. सदरचा पूल हा मोठ्या स्वरुपाचा असल्याने प्रस्तुत ठिकाणी सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत पूलाचे काम मंजूर करण्याबाबत जिल्हा परिषदेद्वारे सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालय जव्हार यांना विनंती करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जिल्हा रुग्णालय, नाशिक येथे शस्त्रक्रियेसाठी लागणारी सामुग्री निकृष्ट दर्जाची असलेबाबत

**(१९) ५०८६१ (२१-०१-२०२३). श्री.दिलीपराव बनकर (निफाड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा रुग्णालय, नाशिक येथे शस्त्रक्रियेसाठी लागणारी सामुग्री अतिशय निकृष्ट दर्जाची असल्याचे माहे ऑक्टोबर २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सामुग्री खरेदी करतांना त्याकडे खरेदी विभागाचे दुर्लक्ष झालेले आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार या प्रकरणात दोषी असण्या-या संबंधितावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (०२-०३-२०२३) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) जिल्हा रुग्णालय, नाशिक येथील अस्थिरोग विभागातील विविध शस्त्रक्रियेकरीता लागणारे ortho implant व TKR THR यांची खरेदी प्रक्रिया जिल्हास्तरावर राबविण्यात आली होती.सदर खरेदी प्रक्रियेसंदर्भात उपसंचालक, आरोग्य सेवा, नाशिक मंडळ, नाशिक यांचे स्तरावरुन चौकशी समिती गठीत करण्यात आली असुन सदर चौकशी समितीचा अहवाल संचालक, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई यांना सादर करण्यात आलेला आहे.सदर अहवालाच्या अनुषंगाने, Audit Wing, Pune व NHM, Audit Wing यांच्या संयुक्त विद्यमाने विशेष लेखापरिक्षण करण्याचे सहसंचालक,खरेदी कक्ष,मुंबई यांनी निर्देशित केले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## धडगाव (जि.नंदुरबार) येथील ग्रामीण रुग्णालयातील रुग्णवाहिका आरोग्य कर्मचाऱ्यांनी पर्यटनासाठी वापरल्याबाबत

**(२०) ५०८६४ (२१-०१-२०२३). श्री.दिलीपराव बनकर (निफाड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धडगाव (जि.नंदुरबार) येथील ग्रामीण रुग्णालयास नवजात शिशुसाठी देण्यात आलेली रुग्णवाहिका येथील आरोग्य कर्मचाऱ्यानी पर्यटनासाठी वापरल्याची घटना माहे ऑगस्ट, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुग्णवाहिका अभावी तालुक्यातील एक बालक प्राणास मुकले असल्याचे देखिल निदर्शनास आले आहे,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पर्यटनासाठी किती आरोग्य कर्मचारी गेले होते, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,त्यानुसार यास जबाबदार असलेल्या संबधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (०३-०२-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.

धडगाव (जि.नंदुरबार) येथील ग्रामीण रुग्णालयात नवजात शिशुसाठी देण्यात आलेल्या रुग्णवाहिकेमध्ये प्रशिक्षित वैद्यकीय अधिकाऱ्यामार्फत उपकरणे बसविण्यासाठी ग्रामीण रुग्णालय, तोरणमाळ येथे नेण्यात आली होती.

(२) हे खरे नाही.

(३) सदर प्रकरणाची जिल्हा शल्य चिकित्सक, नंदुरबार यांनी त्रिसदस्यीय चौकशी समिती नेमूण त्यामार्फत चौकशी करण्यात येत आहे. चौकशीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्या अनुषंगाने दोषी व्यक्तींवर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोल्हापूर शहरातील गांधीनगर वसाहत उपजिल्हा रुग्णालयात अत्यावश्यक सेवा पूरविणे तसेच रिक्त पदे त्वरित भरण्याबाबत

**(२१) ५१०४८ (२१-०१-२०२३). श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर शहरातील गांधीनगर वसाहत उपजिल्हा रुग्णालयात दररोज २०० च्या पुढे रुग्ण उपचारासाठी येत असतानाही डॉक्टरांच्या अपुऱ्या संख्येमुळे रुग्णांना तात्काळ उपचार मिळत नसल्याचे माहे ऑक्टोबर २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रुग्णालयात प्रसूती तज्ञ तसेच रिक्त पदांमुळे रुग्णांची गैरसोय होत असूनही आरोग्य विभागाचे अत्यावश्यक सेवेकडे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करून रुग्णालयात अत्यावश्यक सेवा पूरविणे तसेच रिक्त पदे त्वरित भरण्याबाबत शसासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (०१-०३-२०२३) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) सदरहू रुग्णालयातील वैद्यकिय अधिक्षकाचे पद भरण्यात आलेले आहे. तर स्त्रीरोग व प्रसुती तज्ञाचे पद पदोन्नतीने रिक्त झाल्याने, त्या ठिकाणी राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत स्त्रीरोग व प्रसुती तज्ञाची नियुक्ती करण्यात आलेली आहे. तसेच, सदरहू रुग्णालयातील गट-अ ते गट-ड संवर्गातील एकूण ४८ मंजूर पदांपैकी ३९ पदे भरण्यात आलेली आहे. त्यांच्यामार्फत रुग्णांना आरोग्य सेवा पुरविण्यात येत असुन त्या ठिकाणी रुग्णांची गैरसोय होणार नाही याची दक्षता घेण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## केज (जि.बीड) येथे नवीन प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र मंजूर करणे बाबत

**(२२) ५११६९ (२१-०१-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केज (जि.बीड) येथे सन-२०११ च्या जनगणनेच्या आधारावर १) काळेगाव घाट २) होळ ३) लहुरी ४) येल्डा ५) शेपवाडी ६) माकेगाव ७) पाटोदा या ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्र व १) बनसारोळा २) हदगाव ३) चनई ४) देवगाव ५) माकेगाव ६) पाटोदा, या ठिकाणी उपकेंद्र करणे बाबतचा प्रस्ताव मंजुरी साठी जिल्हा परिषद, बीड. यांनी शासनास सादर केला असून वरील ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र मंजूर करून निधी उपलब्ध करून देणेबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.आरोग्य मंत्री यांच्याकडे दिनांक २२ ऑगस्ट,२०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वरील प्रकरणी शासनाने चौकशी करून किती प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र यांना मंजुरी दिली आहे व त्यासाठी किती रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (२०-०२-२०२३) :** (१) व (२) मा.लोकप्रतिनिधी यांनी दि.२२.०८.२०२२ रोजीच्या पत्रान्वये मा.मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण यांना मौजे काळेगाव घाट ता.केज येथे नवीन प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर करुन त्यास निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी केली आहे. तसेच सन २०११ च्या लोकसंख्येच्या आधारे नवीन आरोग्य संस्था स्थापनेच्या जोडबृहत आराखडा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांच्या प्रस्तावामध्ये १३ प्राथमिक आरोग्य केंद्र व ३८ उपकेंद्र प्रस्तावित केलेली आहेत. त्यामध्ये प्रा.आ.केंद्र येल्डा व पाटोदा या वगळता इतर ठिकाणी आरोग्य संस्था निर्मित करण्याबाबत प्रस्तावित करण्यात आल्या होत्या. त्यापैंकी मौजे लाहुरी येथे नवीन

प्रा.आ.केंद्र मंजुरीस मान्यता दिलेली असून जागा उपलब्ध करणे व निधी उपलब्ध करण्याची कार्यवाही जिल्हा स्तरावरुन करण्यात येत आहे. तसेच आयुक्त स्तरावरुन मौजे बानसारोला ता.केज हे उपकेंद्र स्थापनेच्या निकषात बसत असल्याबाबत कळविले असून त्यानुसार राज्याचा एकत्रित जोडबृहत आराखडा तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच मौजे काळेगाव घाट येथे विशेष बाब म्हणून आरोग्य केंद्र मंजूर करण्याबाबतचा प्रस्ताव पाठविण्याबाबत जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना कळविण्यात आलेले आहे. उर्वरित मौजे होळ, शेपवाडी, माकेगाव या ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्र व हदगाव, चनई, देवगाव, पाटोदा या ठिकाणी प्रस्तावित उपकेंद्र अंतराच्या व लोकसंख्येच्या निकषात बसत नसल्याने सदर प्रस्ताव समितीने अपात्र ठरविले आहेत व त्याबाबत जिल्हा आरोग्य अधिकारी, बीड मार्फत लोकप्रतिनिधीना अवगत करण्याबाबत कळविण्यात आले आहे. हे खरे आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## धारणी (जि.अमरावती) येथे रक्तपेढी उभारण्याबाबत

**(२३) ५१२७१ (२१-०१-२०२३). श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.संजय जगताप (पुरंदर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेळघाटातील धारणी (जि.अमरावती) हा आदिवासीबहुल भाग असून येथे परतवाडा-धारणी राज्यमार्गावर अपघात झाल्यास रुग्णांना धारणी ऐवजी अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालयांत पाठवले जात असल्याने यामध्ये वेळ जात असल्याने रुग्णांना रक्ता अभावी प्राण गमवावे लागतात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे धारणी येथील उपजिल्हा रुग्णालयात स्वतंत्र रक्तपेढी उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (०१-०३-२०२३) :** (१) हे खरे नाही.
उपजिल्हा रुग्णालय, धारणी येथे रक्त साठवणूक केंद्र कार्यान्वीत असून या रक्त साठवणूक केंद्रातून रुग्णांना गरजेप्रमाणे वर्षाला सरासरी ५०० रक्तपिशव्या पुरवठा करण्यात येतो.
(२) शासनाने शासन निर्णय क्र.रक्तपेढी -२०२२/प्र.क्र.२०३/आरोग्य-५, दि.२६.०९.२०२२ अन्वये स्वतंत्र रक्तकेंद्र मंजुर केलेले आहे. हे रक्तकेंद्र कार्यान्वीत करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मालेगाव (ता. अर्धापूर, जि. नांदेड ) येथील ग्रामीण रुग्णालयात कर्मचारी/अधिकाऱ्यांची नियुक्ती करुन कार्यान्वीत करण्याबाबत

**(२४) ५१४८७ (१८-०१-२०२३). श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.माधवराव पवार (हदगाव), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगाव (ता. अर्धापूर, जि. नांदेड ) येथील ट्रॉमा केअर सेंटरचे ग्रामीण रुणालयात रुपांतर करण्यासाठी शासनाने दिनांक ४ फेब्रुवारी,२०२१ रोजीच्या आदेशान्वये तसेच सदर ग्रामीण रुग्णालयाकरीता आवश्यक असणारी वैद्यकीय

कर्मचारी/अधिकाऱ्यांची पदे निर्मीतीस शासनाने दिनांक २३ जून २०२२ रोजीच्या आदेशाने मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुग्णांची होणारी गैरसोय टाळण्याकरीता मंजूर उपरोक्त पदावर तातडीने कर्मचारी/अधिकारी यांची नियुक्ती करुन ग्रामीण रुग्णालय तात्काळ कार्यान्वीत करण्याची विनंती स्थानिक लोकप्रतिनिधींनी यांनी शासनाला केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त रुग्णालय कार्यान्वित करुन वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी यांची नियुक्ती करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (०२-०३-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) कंत्राटी मनुष्यबळ सेवेची ई-निविदा महाटेंडर पोर्टलवर प्रसिध्द करण्यात आली असून ती अंतिम टप्प्यात आहे. तसेच नियमित स्वरुपातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात एक्स बीबी या कोरोनाच्या नवीन विषाणू प्रादुर्भाव रोखण्यासाठी करावयाच्या उपाययोजना**

**(२५) ५१५०६ (२६-१२-२०२२). श्री.धनंजय मुंडे (परळी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोरोना संसर्गाच्या पाठोपाठ एक्स बीबी या कोरोनाच्या नवीन विषाणूचा वेगाने प्रसार होत असल्याची बाब माहे ऑक्टोबर,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या विषाणूचे राज्यात एकूण ३६ रुग्ण आढळले आहेत त्यापैकी २१ रुग्ण पुण्यात व १० रुग्ण ठाण्यात आढळून आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एक्स बीबी या कोरोनाच्या नवीन विषाणूच्या प्रादुर्भावा रोखण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (०१-०३-२०२३) :** (१) हे अंशत:खरे आहे,

ऑक्टोबर २०२२ पासून राज्यात कोविड विषाणूचा एक्सबीबी हा व्हेरियंट आढळू लागला, हे खरे आहे. तथापि ज्या भागात हा नवा व्हेरियंट दिसून आला त्या भागात विषाणूचा प्रसार वेगाने होताना दिसत नाही.

(२) हे अंशत: खरे आहे.

दिनांक ३ डिसेंबर २०२२ पर्यंत राज्यात एक्सबीबी चे १८६ रुग्ण आढळले आहेत. आता पर्यंत राज्यात मुंबई (७२), पुणे (७७), ठाणे (२६), नागपूर, कोल्हापूर प्रत्येकी ३, भंडारा २, अकोला, अमरावती, रायगड प्रत्येकी १ असे एकूण १८६ एक्सबीबी व्हेरियंट सापडले आहेत.

(३) राज्यात एक्सबीबी इतर सर्व व्हेरियंटच्या पार्श्वभूमीवर कोविड प्रतिबंध आणि नियंत्रणासाठी पुढील उपाययोजना करण्यात येत आहे.

• आय.एल.आय. आणि सारी रुग्णांचे नियमित सर्वेक्षण.
• रोगनिदानासाठी प्रयोगशाळा उपलब्ध आहेत.
• रुग्णोपचारासाठी पुरेशी रुग्णालयीन व्यवस्था.
• कोविड विषाणूच्या जनुकीय क्रमनिर्धारणासाठी राज्यात ७ प्रयोगशाळा कार्यरत आहे.
• नवीन व्हेरियंट आढळलेल्या रुग्णांचा साथरोग शास्त्रीय अभ्यास आणि त्यानुसार कार्ययोजना.
• कोविड प्रतिबंध लसीकरण.
• कोविड प्रतिबंधासाठी आरोग्य शिक्षण आणि लोकप्रबोधन.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील जेष्ठ नागरिकांना महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य ही योजना लागू करणेबाबत

**(२६) ५१५३६ (२१-०१-२०२३). श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ६० वर्षावरील सर्व जेष्ठ नागरिकांना महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य ही योजना सरसकट लागू करून आरोग्य विमा सुरू करावा अशी मागणी महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघाच्या वतीने शासनास करण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात ६० वर्षावरील सर्वांना सरसकट सदर आरोग्य विमा योजना लागू करण्याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे काय,

(३) नसल्यास, त्यामागील कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१०-०३-२०२३) :** (१) हे खरे आहे.

महाराष्ट्र ज्येष्ठ नागरीक महासंग (फेस्कॉम) यांनी दि.१८.०१.२०२१ रोजी तत्कालीन उपमुख्यमंत्री यांना निवेदन सादर केले होते.

(२) राज्यात राबविण्यात येत असलेल्या एकत्रित महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्यमान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेमधील पात्र कुटुंबातील ६० वर्षावरील सर्व ज्येष्ठ नागरीकांचा समावेश आहे.

कोरोना कालावधीमध्ये महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजना राज्यातील सर्व नागरीकांना दि.२३.०५.२०२० ते दि.०६.०६.२०२२ या कालावधीत लागू करण्यात आली होती. त्याच धर्तीवर सदर योजना सरसकट सर्व नागरीकांना लागू करण्याबाबतचा प्रस्ताव विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### नागपूर येथे स्वाईन फ्लू आजारावरील लस उपलब्ध नसल्याबाबत

**(२७) ५१६७० (२६-१२-२०२२). डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर विभागात स्वाईन फ्लु बाधितांची संख्या अधिक असतानाही या आजाराला प्रतिबंध करणारी लस अद्याप येथे उपलब्ध नसल्याचे माहे ऑगस्ट, २०२२ च्या पहिल्या आठवडयात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आजाराच्या संभाव्य धोका लक्षात घेता नागपूर येथे स्वाईन फ्लु सह संसर्गजन्य आजारावरील नियंत्रणासाठी उपचारासाठी एकही शासकीय रुग्णालय नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संदर्भात शासनाने निर्णय घेवून व निधीची तरतूद करुन येथे स्वाईन फ्लु प्रतिबंधक लसीचा पुरवठा करण्यासह नागपूर येथे संसर्गजन्य आजारांवर नियंत्रण व उपचारासाठी स्वंतत्र रुग्णालय उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (०१-०३-२०२३) :** (१) हे खरे नाही.

नागपूर परिमंडळात ऑगस्ट महिन्याच्या सुरुवातीला स्वाईन फ्ल्यू रुग्ण आढळून आलेले असले तरीही नागपूर विभागाकरीता दिनांक ०२/०८/२०२२ रोजी ९८५० डोसेस उपलब्ध करुन देण्यात आले असून प्रत्येक जिल्ह्याला मागणी प्रमाणे वितरीत करण्यात आले.

(२) हे खरे नाही.

नागपूर जिल्हयात उपजिल्हा रुग्णालय कामठी, रामटेक तसेच शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नागपूर, इंदिरा गांधी

शासकीय महाविद्यालय, नागपूर येथे संसर्गजन्य आजाराच्या रुग्णांवरील उपचाराकरीता स्वतंत्र कक्ष ठेवण्यात आला आहे. तसेच, परिमंडळात भंडारा, गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूर व वर्धा या जिल्हयात संसर्गजन्य आजाराच्या रुग्णांवरील उपचाराकरीता स्वतंत्र कक्ष ठेवण्यात आला आहे.

(३) नागपूर परिमंडळातील सर्व जिल्हयात स्वाईन फ्ल्यू लस उपलब्ध करुन देण्यात आली आहे. तसेच नागपूर येथे संसर्गजन्य आजारावर नियंत्रण व उपचारासाठी स्वतंत्र रुग्णालय प्रस्तावित नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाने कायद्यात बदल केल्याबाबत.

**(२८) ५२०२६ (२२-०१-२०२३). श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाने जुन्या कायद्यात बदल करुन निकषांचा मसुदा तयार केला असून प्रस्तावित मसुद्यात नवीन मेडिकल कॉलेजसाठी १००० खाटांचे मल्टी स्पेशालिटी रुग्णालय असावे यासह अनेक जाचक अटी नमूद केल्या आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने प्रत्येक जिल्ह्यात वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्याचा निर्णय घेतलेला असतांना आयोगाच्या या नव्या निकषामुळे नवीन वैद्यकीय महाविद्यालये सुरु करण्यास अडचणी निर्माण होणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वैद्यकीय आयोगाकडून प्रस्तावित करण्यात आलेल्या निकषातील बदलाच्या अनुषंगाने शासनाने पुढे कोणती निर्णयात्मक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीश महाजन (०६-०३-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गोंदिया जिल्हयात पोषण आहार लाभार्थी पोषण आहारापासून वंचित असल्याबाबत..

**(२९) ५२१०४ (२०-०१-२०२३). श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्हयात हजारो पोषण आहार लाभार्थी पोषण आहारापासून वंचित असल्याची बाब माहे सप्टेंबर,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन सदरील लाभार्थांना पोषण आहार देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, ?

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा (०३-०२-२०२३) :** (१) हे खरे नाही.

गोंदिया जिल्हयामध्ये ६ महिने ते ३ वर्ष वयोगटातील बालके, गरोदर महिला व स्तनदा माता या लाभार्थ्यांना नियमित घरपोच आहार पुरवठा करण्यात येतो. तसेच ३ वर्ष ते ६ वर्ष या वयोगटातील लाभार्थ्यांना गरम ताजा आहार नियमितपणे पुरविण्यात येतो.

(२) पुरक पोषण आहार नियमित पुरवठयासाठी पुरवठा आदेश देण्यात आलेले आहेत. तसेच, केंद्र शासनाकडून Wheat Based Nutrition Programme अंतर्गत मिळणारे गहू व तांदुळाचे वितरण वेळेत करण्यात येते व नियमित आहार पुरवठा करण्यात येतो.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बेकायदा अवयव प्रत्यारोपाची प्रकरणे रोखण्याबाबत

**(३०) ५२२५९ (२१-०१-२०२३). श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील रुबी हॉल क्लिनिक रुग्णालयात बेकायदा अवयव प्रत्यारोपण होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खर आहे काय,
(२) तसेच, पूणे वानवडीतील इनामदार रुग्णालय व ठाण्यातील जुपीटर रुग्णालय येथेही बेकायदा किडनी प्रत्यारोपणात सहभाग असल्याचे निदर्शनास आले असल्याने सदर प्रकरणी संचलक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन,मुंबई याना चौकशी करुन अहवाल सादर करण्यास कळविले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणांची शासनाने केलेल्या कार्यवाहीची सद्यस्थिती काय आहे?

**डॉ. तानाजी सावंत (१३-०३-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३)

रुबी हॉल क्लिनिक, पुणे या रुग्णालयात झालेल्या किडनी प्रत्यारोपण प्रकरणी दाखल झालेल्या गुन्ह्यातील तपासामध्ये सन २०१२-१३ मध्ये रुबी हॉल क्लिनिक पुणे येथे, सन २०१४ व २०१५ मध्ये इनामदार हॉस्पीटल पुणे, येथे सन २०१६ मध्ये ज्युपीटर हॉस्पीटल ठाणे येथे बनावट नातेवाईकांची कागदपत्रे सादर करुन किडनी प्रत्यारोपण झाल्याबाबत पोलीस उपआयुक्त (गुन्हे), पुणे शहर यांनी कळविले होते.

त्या अनुषंगाने संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई व जिल्हा शल्य चिकित्सक, पुणे यांनी सखोल चौकशी करुन अहवाल सादर केला आहे.

संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांनी अनरिलेटेड प्रत्यारोपणाबाबत सखोल चौकशी करुन सादर केलेल्या अहवालानुसार सन २०१२ मध्ये रुबी हॉल क्लिनिक पुणे येथे, सन २०१४ मध्ये इनामदार हॉस्पीटल पुणे येथे झालेल्या अनरिलेटेड किडनी प्रत्यारोपणास बी.जे. वै. महाविद्यालय, पुणे येथील विभागीय प्रत्यारोपण समितीने संबंधित रुग्णालयांनी सादर केलेल्या नस्तींची पडताळणी करुन परवानगी दिलेली होती.

तसेच ज्युपीटर हॉस्पीटल, ठाणे यांना सन २०१६ मध्ये तत्कालीन राज्यस्तरीय कमिटीने संबंधित रुग्णालयाने सादर केलेल्या नस्तींची तसेच अवयवदाता व प्राप्तकर्ता यांची सखोल चौकशी करुन अनरिलेटेड किडनी प्रत्यारोपणास परवानगी दिलेली आहे, असे नमूद केले आहे.

त्याचप्रमाणे २०१५ मध्ये रुबी हॉल क्लिनिक, पुणे येथे सन २०१४-१५ मध्ये इनामदार हॉस्पीटल, पुणे येथे झालेल्या अनरिलेटेड किडनी प्रत्यारोपणबाबत जिल्हा शल्य चिकित्सक, पुणे यांच्या अध्यक्षतेखालील चौकशी समितीने तत्कालीन लोकल ॲथोरायझेशन कमिटीने दिलेल्या मंजुरीच्या कागदपत्रांची तपासणी करुन दिलेल्या अहवालामध्ये रुग्णालयातील डॉक्टर, कर्मचारी दोषी असल्याचे आढळून येत नाही. त्यामुळे उपरोक्त नमूद रुग़ालयांवर कार्यवाही करता येत नाही.

तथापि, सदरच्या अवैध किडनी प्रत्यारोपणाबाबत झालेल्या गैरप्रकाराबाबत पोलीसांकडे भा.द.वि.च्या अनुषंगाने एफ आय आर दाखल करण्यात आले आहे व कलम १०, १८, २०, १९ (फ) अंतर्गत मा. मुख्य न्यायदंडाधीकारी पुणे येथे न्यायालयीन प्रकरण दाखल करण्यात आले आहे व प्रकरण न्याय प्रविष्ठ आहे. या प्रकरणातील दोन्ही आरोपी एजंट श्री. अभिजित गटणे व श्री. रविंद्र रोडगे हे मध्यवर्ती कारागृह पुणे येथे कोठडीत आहेत.

---

### उस्मानाबाद जिल्हयातील स्त्री रुग्णालयात रुग्णांची गैरसोय होत असल्याबाबत.

**(३१) ५३०७९ (२१-०१-२०२३). श्री.माधवराव पवार (हदगाव), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्हयातील स्त्री रुग्णालयात खाट उपलब्ध नसल्याने एका महिलेची स्वच्छतागृहामध्ये प्रसूती झाल्याची घटना घडली असल्याचे माहे नोव्हेंबर,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील रुग्णालयात कमी कर्मचारी वर्ग व खाटांची संख्या कमी असून येथे रुग्ण संख्या अधिक असल्यामुळे असे प्रकार घडत असल्याचे निदर्शनास आले आहे,हे ही खरे आहे काय,

(३)असल्यास, या रुग्णालयाचा विस्तार व २०० खाटांना मंजूरी सन २०१२ मध्ये देण्यात आली असूनही अद्याप कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरील प्रकरणी चौकशी करण्यात आली काय, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१०-०३-२०२३) :** (१) नाही.

(२) सदरील रुग्णालयात खाटांची संख्या व कर्मचारी वर्ग कमी असून देखील येथे रुग्ण संख्या अधिक आहे. रुग्णालयात येणाऱ्या स्त्री रुग्णांची संख्या पहाता काही प्रसंगी प्रसुती झालेल्या स्त्रीयांना खाट उपलब्ध नसल्यास फ्लोअर बेड देण्यात येते. हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### नेकनूर, सावंतवाडी (ता. जि. बीड) येथे सातारा पोत्रा साठवण तलावा मधून जलजीवन मिशन अंतर्गत प्रस्तावास मंजुरी देण्याबाबत

**(३२) ५३४९५ (२१-०१-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेकनूर, सावंतवाडी (ता. जि. बीड) येथे पाणीपुरवठा योजनेचे सर्वेक्षण झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजना सातारा पोतरा साठवण तलावा मधून योग्य असून या तलावाची पाणी साठवून क्षमता ५.७४ द.ल आहे परंतु सदर तलावातून नेकनूर सावंतवाडी योजना करण्यासाठी कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा विभाग, बीड. यांच्या सांगण्यावरुन सातारा पोत्रा साठवन तलावातून पाण्याची विश्वासहार्तता दहा वर्षाची लागेल त्यामुळे योजना करण्यास विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सोन्ना खोटा साठवण तलाव येथून वडवणी येथे यावर्षी जलजीवन अंतर्गत योजना मंजूर झाली आहे. सदर तलाव नवीन असून त्या ठिकाणाहून वडवणी येते जलजीवन अंतर्गत योजना झाली असल्याने नेकनूर येथे सातारा पोत्रा साठवण तलावा अंतर्गत प्रस्ताव करून मंजुरी देण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बीड यांच्याकडे दिनांक २१ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले, त्या अनुषंगाने उक्त निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गुलाबराव पाटील (२२-०२-२०२३) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

सातरा पोत्रा साठवण तलावातील पाण्याची विश्वासार्हता तपासणी करूनच अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. त्यामुळे विलंब झालेला नाही.

(३) व (४) होय, हे खरे आहे.

त्यांच्या मागणीप्रमाणे तांत्रिक बाबींची खात्री करुनच नेकनुर व सावंतवाडी या गावांसाठी सातरा पोत्रा साठवण तलावातुन योजना प्रस्तावित केलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**परभणी जिल्हयातील वालूर व मानवत येथील रुग्णालयात रुग्णाची गैरसोय होत असल्याबाबत.**

**(३३) ५३७३७ (२१-०१-२०२३). श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वालूर (जि.परभणी) यथील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये सोन्ना, शेलवाडी, डुगरा, मोरेगाव अशी १४ उपकेंद्रे व ५३ गावातील नागरिक उपचारासाठी येत असून सदर या आरोग्य केद्राच्या इमारतीची दुरवस्था झाली असून बाहय रुग्ण विभाग (ओ.पी.डी. ) अन्य इमारतीत गत दोन वर्षांपासून सुरू करण्यात आले असून येथे पूर्वी सुरू असलेल्या शस्त्रक्रिया, शवविच्छेदनाच्या सेवा व इतरही महत्त्वाच्या आरोग्य सुविधा बंद असल्याने रूग्णांना खाजगी रूग्णांलयात स्वखर्चाने उपचार घ्यावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या इमारतीच्या दुरूस्तीकरिता रू. ७ कोटी इतक्या रकमेचा प्रस्ताव जिल्हा परिषदेमार्फत नियोजन समितीकडे सादर करण्यात आला असून अद्याप त्यावरही कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच,मानवत (जि.परभणी) ग्रामीण रूग्णालयात आवश्यक आरोग्य सुविधा मिळत नसल्याने रूग्णांची गैरसोय होत असून येथे आवश्यक स्त्रीरोग तज्ञ व अन्य वैद्यकीय अधिकारी वर्ग उपलब्ध असतानाही गत सहा महिन्यात येथे उपचारार्थ आलेल्या जवळपास १४३ गर्भवती महिलांना उपचारासाठी अन्य रूग्णालयात पाठविण्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे,हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वालूर यथील प्राथमिक आरोग्य केंद्र या इमारतीची दुरूस्ती तसेच मानवत येथील ग्रामीण रूग्णालयात उपचारार्थ येणाऱ्या रूग्णांना अन्य रूग्णालयांत पाठविणाऱ्या संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबबात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१४-०२-२०२३) :** (१) प्राथमिक आरोग्य केंद्र, वालुर, जि.परभणी येथील इमारत मोडकळीस आल्यामुळे पाडण्यात आली आहे. तथापि, प्राथमिक आरोग्य केंद्राच्या परिसरातील उपलब्ध असलेल्या ४ खाटाच्या इमारतीत प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यरत असून त्यामार्फत आतंरुग्ण, बाह्यरुग्ण व प्रसुती व इतर आवश्यक आरोग्य सेवा पुरविण्यात येतात. हे खरे आहे.

(२) सन २०२२-२३ मध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र बांधकामासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत जिल्हा नियोजन समितीकडे रु.६.०० कोटी रुपयाचा प्रस्ताव सादर करण्यात आला असून सदर इमारत बांधकामाबाबत प्रशासकीय मान्यतेची कार्यवाही जिल्हास्तरावर सुरु आहे.

(३) मानवत येथे ग्रामीण रुग्णालय कार्यरत असून सदर ठिकाणी वैद्यकीय अधिक्षक व ३ वैद्यकीय अधिकारी यांची पदे भरलेली आहेत. ग्रामीण रुग्णालय, मानवत येथील इमारत मोडकळीस आलेली असून शस्त्रक्रियागृह वापरण्यास योग्य नसल्याबाबत बांधकाम विभागाने दिलेल्या अहवालानुसार शस्त्रक्रियागृह बंद करण्यात आले आहे. त्यामुळे तेथे शस्त्रक्रिया होत नाहीत. तथापि, नॉर्मल प्रसुती करण्यात येत असून एप्रिल, २०२२ ते ऑक्टोंबर, २०२२ या कालावधीत २३४ मातापैंकी १३५ मातांच्या नॉर्मल प्रसुती करण्यात आल्या असून गंभीर व पुढील औषधासाठी गरज असलेल्या ९९ गर्भवती माताना वरील शासकीय रुग्णालयात संदर्भित केले आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अमरावती येथील जिल्हा स्त्री रुग्णालीयात (डफरीन) येथे सिझेरियनबाबत नियम करणे तसेच रिक्त पदे भरण्याबाबत

**(३४) ५३७४३ (२२-०१-२०२३). ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती येथील जिल्हा स्त्री रुग्णालयात (डफरीन) येथे सुरक्षित प्रसूतीसाठी सिझेरियन केले जात असून गेल्या पाच वर्षात येथे एकूण ४३ हजार ६२ महिला प्रसूत झाल्या असून त्यापैकी १६ हजार ९११ महिलांचे सिझेरियन करावे लागले तसेच २१ मातांसह ९१३ अर्भकांचा मृत्यू झाला असल्याचे दिनांक १८ ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथे बालरोग तज्ञ, स्त्रीरोगतज्ञ इ.पदे रिक्त असल्याने येथे उपचारासाठी आलेल्या महिला व बालकांना योग्य उपचार मिळत नाहीत तसेच चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांचाही अभाव आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात चौकशी करुन येथील सिझेरियनबाबत नियम घालून देणे तसेच रिक्त पदांचा आढावा घेऊन येथील रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (२८-०२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

तथापि, गेल्या ५ वर्षात येथे एकूण ५३ हजार २२ महिला प्रसूत झाल्या असून त्यापैकी २१ हजार १९५ महिलांचे सिझेरीयन करावे लागले तसेच दि. ३१ ऑक्टोबर, २०२२ पर्यंत ३२ मातांसह ११५८ अर्भकांचा मृत्यु झाला आहे.

(२) हे अंशत: खरे आहे

या रुग्णालयात नियमित स्त्री रोग तज्ञ (वर्ग १ व २) ६ पदे रिक्त आहेत. बाल रोग तज्ञ (वर्ग १) १ पद रिक्त आहे. मात्र राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत ९ बाल व ४ स्त्री रोग तज्ञ व १ भूल तज्ञ भरण्यात आलेले आहेत. त्यामुळे उपचाराकरीता आलेल्या महिला व बालकांना योग्य उपचार मिळत नाहीत हे म्हणणे खरे नाही.

(३) नियमित पदे रिक्त असल्याने कंत्राटी स्वरुपात IPHS अंतर्गत ९ बाल रोग तज्ञ, ४ स्त्री रोग तज्ञ व १ भूल तज्ञ यांच्या सेवा उपलब्ध करुन देण्यात आल्या असून कंत्राटी चतुर्थश्रेणी कर्मचारी यांच्या सेवा बाह्य स्त्रोतामार्फत उपलब्ध करून घेण्यात येते. तसेच सर्व रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील जन्मतः कुष्ठरोग असलेल्या रुग्णांना ४०% विकलांग असल्याची अट रद्द करण्याबाबत

**(३५) ५३९९० (२१-०१-२०२३). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कुष्ठरोगी रुग्णांना विकलांग प्रमाणपत्र देत असताना ४०% च्या वर अपंगत्व असण्याची अट आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जन्मत: कुष्ठरोगाने ग्रासलेल्या रुग्णांना त्यामुळे अडचणी येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जन्मतः कुष्ठरोग असलेल्या रुग्णांना ४०% विकलांग असल्याची अट रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात येणार आहे काय,

(४) नसल्यास, त्यामागील कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (०२-०३-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.

दिव्यांगांची टक्केवारी ही त्या व्यक्तीच्या विकलांगतेनुसार तज्ञामार्फत निश्चित केली जाते.

(२) हे खरे नाही.

(३) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय दिनांक १३ सप्टेंबर, २०२२ नुसार ४० टक्के पेक्षा जास्त दिव्यांगत्व असलेल्या २१ प्रकारच्या दिव्यांगांना शासकीय फायदे अनुज्ञेय आहे.

४० टक्के पेक्षा कमी विकलांग असल्याची अट शिथिल अथवा रद्द करणे ही बाब सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अखत्यारीत येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेत रुग्णालयांत वाढ करण्याबाबत.**

**(३६) ५४०६० (२१-०१-२०२३). ॲड.अशोक पवार (शिरुर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेची व्याप्ती वाढविण्यात येणार असून राज्यात प्रत्येक तालुक्यात एक रुग्णालय या योजनेत सहभागी करण्याचा निर्णय घेण्यात आला असून या योजनेतील रुग्णालयांची संख्या वाढवून ती एक हजार करण्यात येईल अशी माहिती मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांनी दिली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे जिल्हयातील कोणते तालुके या योजनेत समाविष्ठ करण्यात आले आहेत,

(३) असल्यास, या योजनेत प्राथमिक उपचार व डायलेसेस सुविधा मिळणेसाठी शासनाने कोणत्या स्वरुपाची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**डॉ. तानाजी सावंत (०२-०३-२०२३) :** (१) दि.२६ फेब्रुवारी, २०१९ च्या शासन निर्णयानुसार एकत्रित महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेमध्ये प्रत्येक तालुक्यात किमान २ रुग्णालय व राज्यात एकूण १००० रुग्णालय अंगीकृत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

(२) पुणे जिल्हयातील १४ तालुक्यांपैकी १२ तालुक्यात एकूण ६४ अंगीकृत रुग्णालये कार्यरत आहेत.

(३) या योजनेअंतर्गत व्दितीय व तृतीय श्रेणीच्या वैद्यकीय सेवांचा समावेश असून यामधील नेफ्रोलॉजी तज्ञसेवे अंतर्गत डायलेसिसचे उपचार केले जातात.

---

**सोलापूर जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी केलेल्या गैरव्यवहाराबाबत.**

**(३७) ५४१५५ (२१-०१-२०२३). श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी बेकायदेशीरपणे केलेल्या बदल्या व प्रतिनियुक्त्या, औषध खरेदीत केलेला गैरव्यवहार याबाबतची चौकशी करून निलंबनाची कारवाई करण्याची मागणी मा.आरोग्य मंत्री यांच्याकडे करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार याबाबत शासनाने संबंधीत अधिका-यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (०१-०३-२०२३) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) होय.

(३) चौकशीअंती डॉ.शितलकुमार जाधव, जिल्हा आरोग्य अधिकारी, सोलापूर यांना दिनांक २८.१२.२०२२ च्या शासन आदेशान्वये निलंबित करण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बेकायदा गर्भलिंग निदान करून गर्भपात केल्याबाबत**

**(३८) ५४४०४ (२१-०१-२०२३). श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साताऱ्यात गर्भलिंग निदान करून महाडमध्ये बेकायदा गर्भपात करताना एका महिलेचा पूर्ण गर्भ निघाला नसल्यामुळे तिला त्रास होऊ लागल्याने तिची प्रकृती अत्यवस्थ झाल्यामुळे रुग्णाला ससून रुग्णालयात दाखल करण्यात आले असल्याची घटना माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली , हे खरे आहे काय,

(२) असल्यास,या प्रकरणातील आरोपी संशयित डॉक्टर अद्यापही सापडले नसून गर्भपात केलेल्या महिलेची चौकशी आणि संशयित आरोपींचा तपास सुरू आहे, “ असे जिल्हा शल्यचिकित्सक,सातारा यांच्याकडून सांगण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (०१-०२-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) हे अंशतः खरे आहे.

सदर प्रकरणी महाड एमआयडीसी पोलीसांनी डॉ. राजेंद्र विजय केंद्रे, निर्मला राजेंद्रकुमार केंद्रे व प्रफुल्ल अनिल गुरव यांना अटक केली असून डॉ. बरकत उर्फ सिकंदर आदम शेख यांना मा. उच्च न्यायालय मुंबई यांनी अटकपुर्व जामीन मंजुर केला आहे. तसेच रिसु हरिश्चंद्र यादव ही आरोपी फरार आहे.

सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली असून पोलीस उपनिरीक्षक, तळेगांव दाभाडे पोलीस ठाणे जि. पुणे यांच्या फिर्यादीवरुन महाड एमआयडीसी पोलीस ठाणे महाड, जि. रायगड यांनी आरोपींविरुध्द वैद्यकीय गर्भपात कायदा १९७१ च्या कलम ३, ४, ५ आणि भारतीय दंड विधान कलम ३१३, ३१५, ३०८ व ३४ अन्वये दि. ०४/१०/२०२२ रोजी गुन्हा क्र.११७/२०२२ नुसार गुन्हा नोंदविला आहे. गुन्ह्यातील अटक आरोपींच्या विरोधात तपास पूर्ण करुन प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालय, महाड येथे दि. ०३/१२/२०२२ रोजी दोषारोपपत्र सादर केले आहे.

त्याचप्रमाणे वैद्यकिय अधिक्षक, ग्रामीण रुग्णालय, महाड यांच्या फिर्यादीवरुन महाड पोलीस स्टेशन, महाड यांनी आरोपींविरुध्द वैद्यकीय गर्भपात कायदा १९७१ च्या कलम ३, ४,५, ७आणि गर्भधारणापूर्व व प्रसूतीपूर्व निदान तंत्रे (लिंग निवडीस प्रबिंध) कायदा १९९४ च्या कलम २३ अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**देगलूर (जि.नांदेड) येथे मंजूर उपजिल्हा रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करून**
**इमारत बांधकामास निधी उपलब्ध करून देणे बाबत**

**(३९) ५४५५० (२१-०१-२०२३). श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देगलूर (जि.नांदेड) येथे कार्यान्वित असलेल्या ५० खाटांच्या रुग्णालयाचे १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयामध्ये श्रेणीवर्धन करण्यास मंजुरी मिळूनही नवीन इमारत बांधकामास निधी अद्यापही उपलब्ध करून देण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आंध्र प्रदेश व कर्नाटकला जोडणाऱ्या देगलूर येथे गोरगरीब सर्वसामान्य रुग्णांच्या आरोग्यासाठी उपजिल्हा रुग्णालयाची सुसज्ज व आधुनिक इमारत बांधकाम तातडीने होणे अत्यंत गरजेचे असताना केवळ निधी अभावी सदरचे बांधकाम होऊ शकलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, देगलूर उपजिल्हा रुग्णालयाचे नवीन इमारत बांधकामास स्थानिक लोकप्रतिनिधींनी केलेल्या मागणीनुसार शासन कधीपर्यंत पूर्णत्वास नेणार वा त्याबाबत सुरू असलेली कार्यवाही काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (१०-०३-२०२३) :**(१) होय.
(२) होय.
(३) देगलूर येथील श्रेणीवर्धीत रुग्णालयाच्या बांधकामाचे रु.२६१६.३२ लक्ष इतक्या रकमेचे अंदाजपत्रक व आराखडयास मान्यता देण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंद्रपूर जिल्हा सामान्य रुग्णालयातील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(४०) ५४५६६ (२२-०१-२०२३). श्री.सुभाष धोटे (राजूरा) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्हा सामान्य रुग्णालयात जिल्हयासोबत लगतचे जिल्हे, शेजारी राज्यातील नागरिक उपचारांसाठी येत असतात मात्र तेथे डॉक्टरांअभावी रुग्णांना उपचार मिळण्यास विलंब होत असल्याचे निदर्शनास आले आहे,हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रुग्णालयातील वॉर्ड क्र ८ येथे ३५ खाटा असून येथे एकच परिचारिका असल्यामुळे या वॉर्डात तातडीने डॉक्टरची नियुक्ती करावी यासाठी सामाजिक संघटनांद्वारे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान आंदोलने करण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, रुग्णालयात अद्ययावत सोयी सुविधा उपलब्ध करण्यात अधिष्ठाता डॉ.नितनवरे यांना अपयश आल्याचा आरोपही आंदोलनकर्त्यांकडून करण्यात आला, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त रुग्णालयात सर्व वैद्यकीय सोयीयुक्त चांगली, प्रभावी रुग्णसेवा देण्यासह वैद्यकीय अधिकारी, पॅरामेडिकल स्टाफ, टेक्निशियन यांची रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीश महाजन (१०-०३-२०२३) :** (१) हे खरे नाही. उपलब्ध मनुष्यबळात रुग्णावर तात्काळ उपचार केले जातात.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक व सहायक प्राध्यापक या संवर्गातील सरळसेवेच्या कोट्यातील रिक्त पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरण्यात येत आहे. तसेच पदोन्नतीच्या कोट्यातील रिक्त पदे आस्थापना मंडळामार्फत भरण्याची कार्यवाही सुरू आहे. गट-क मधील सरळसेवेची पदे भरण्याबाबतची कार्यवाही संचालनालय स्तरावर सामान्य प्रशासन विभागाच्या दि.०४.०५.२०२२ व २१.११.२०२२ च्या शासन निर्णयामधील तरतुदीनुसार करण्यात येत आहे. तसेच वर्ग-४ ची सरळसेवेची पदे ही जिल्हास्तरीय समितीमार्फत भरण्याबाबत सर्व अधिष्ठातांना सुचना दिल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुरुड (जि.रायगड) तालुक्यातील अंगणवाडी सेविकांनी आपल्या पदाचा राजीनामा सादर केला असले बाबत**

**(४१) ५४६२३ (२०-०१-२०२३). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुरुड (जि.रायगड) तालुक्यातील १७ अंगणवाडी सेविकांनी नायब तहसिलदार यांच्या त्रासाला कंटाळून आपल्या पदाचा सामूहिक राजीनामा सादर केला असल्याची बाब माहे ऑक्टोबर , २०२२ च्या दुस-या आठवडयात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या अनुषंगाने अंगणवाडी सेविकांनी जिल्हाधिकारी, रायगड यांना निवेदन दिले आहे,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर १७ अंगणवाडी सेविकांचा सामुहिक राजीनामा न स्वीकारता यातून कोणता मध्य मार्ग काढण्यासाठी व प्रशासनात योग्य समन्वय साधण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा (२७-०१-२०२३) :** (१) रायगड जिल्ह्यातील मुरुड तालुक्यातील १७ अंगणवाडी सेविकांनी अंगणवाडी सेविका या पदाचा राजीनामा दिलेला नसून त्यांनी BLO (बूथ स्तर अधिकारी) पदाचा राजीनामा जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड येथे दिला होता.
(२) हे खरे आहे.
(३) प्रस्तुत प्रकरणी या अंगणवाडी सेविकांसमवेत तहसिलदार, मुरुड कार्यालयात चर्चा करून त्यांच्या तक्रारीचे समाधान केलेले असून त्यामुळे संबंधित सेविकांनी स्वखुशीने लेखी स्वरूपात तक्रार मागे घेतली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### नंदुरबार जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रामधील औषधांचा तुटवडाबाबत

**(४२) ५४८४५ (२२-०१-२०२३). श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नंदुरबार जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रांत खास करुन अतिदुर्गम भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रांत औषधांचा तुटवडा भासत असल्यामुळे रुग्णांना त्यांच्या आजारावरील औषधे पुरविण्यात येत नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्याची काय आहेत?
(३) असल्यास,नंदुरबार जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रांना पूर्ण क्षमतेने औषधांचा पुरवठा करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१३-०२-२०२३) :** (१) हे खरे नाही.
सदय:स्थितीत जिल्हास्तरावर विविध प्रकारची औषधे उपलब्ध असुन या औषधी साठयाचे जिल्हयातील प्राथमिक आरोग्य केंद्रांना वितरण सुरु आहे.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### सक्षम प्राधिकाऱ्यांकडून जातीचे प्रमाणपत्र मिळेपर्यंत वैद्यकीय महाविद्यालये व इतर क्षेत्रात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थी उमेदवारांबाबत

**(४३) ५४८९५ (२१-०१-२०२३). डॉ.किरण लहामटे (अकोले) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी मेडिकल व इतर क्षेत्रामध्ये प्रवेश घेण्यासाठी त्याबाबतच्या अटी व शर्ती (कंडिशनल व्हॅलिडीटी) अनुसार प्रवेश दिला जातो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुसार प्रवेश दिला जात असेल तर जातीचे प्रमाणपत्र (कंडिशनल व्हॅलिडीटी) किती दिवसात सादर केले पाहिजे आणि जर त्यादरम्यान सदर प्रमाणपत्र (कंडिशनल व्हॅलिडीटी) सादर केले नाहीतर त्या विद्यार्थ्यांवर पुढे कोणती कारवाई करण्यात येते,
(३) तसेच, आतापर्यंत जातीचे प्रमाणपत्र अवैध आढळून आल्यावर अशा किती विद्यार्थ्यांवर कारवाई करण्यात आली आहे,

(४) तसेच, त्या कंडिशनल व्हॅलिडीटीचा आधार घेऊन शिक्षण संपेपर्यंत कधीकधी स्थगिती (स्टे) देऊन त्या विद्यार्थ्यांची ती पदवी (डिग्री) परीक्षा पूर्ण होते तोपर्यंत या कंडिशनल व्हॅलिडीटीवरच कोर्टातून स्थगिती घेऊन शिक्षण दिले जाते काय,
(५) तसेच, हया कंडिशनल व्हॅलिडीटीसाठी वारंवार मुदतवाढ देऊन त्या प्रवेशित विद्यार्थ्यांनी व्हॅलिडीटी प्रमाणपत्रे सादर केली नाही तर त्याच्या पदवी परिक्षे प्रकरणी (डिग्री) काय कारवाई केली जाते आणि जे प्रवेशित विद्यार्थी दोषी राहतात त्यांच्यावरती व त्यांना पाठीशी घालणारे जे अधिकारी-कर्मचारी आहेत त्याच्यावरती आतापर्यंत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१३-०३-२०२३) :** (१) नाही.
प्रवेशावेळी जातवैधता प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.
(२), (३), (४), (५) व (६)
प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापूर शहर व जिल्हात आरोग्य विभागा करीता औषध खरेदीसाठी निधी उपलब्ध करूनही औषध खरेदी न केल्याबाबत

**(४४) ५४९२४ (२२-०१-२०२३). श्री.विजयकुमार देशमुख (सोलापूर शहर उत्तर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर शहर व जिल्हा परिषद आरोग्य विभागाकरीता अडीच कोटी रुपयांची औषध खरेदीला जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत मंजूरी देण्यात आली असून अद्यापपर्यंत जिल्हा आरोग्य अधिका-यांनी औषधे खरेदीला मंजूरी दिली नसल्याचे दिनांक ४ नोव्हेंबर,२०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत जिल्हा नियोजन समितीकडून औषधे खरेदीकरीता निधी उपलब्ध करण्यात आला आहे काय,
(३) नसल्यास, याबाबत किती कालावधीत निधी उपलब्ध करण्यात येणार आहे,
(४) तसेच, निधी उपलब्ध असेल तर जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी औषध खरेदी करण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (०२-०३-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ,सोलापुर यांनी दि. १६.०९.२०२२ रोजी औषध खरेदीसाठी रुपये २.५ कोटी रक्कमेस प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.
(२) व (३)जिल्हा नियोजन सर्वसाधारण अर्थसंकल्प सन २०२२-२३ करीता प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रासाठी औषधे खरेदीसाठी रुपये २.५ कोटी मंजुर करण्यात आले असुन सदर निधी कोषागारातुन मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापुर यांच्याकडे वर्ग करण्याची प्रक्रिया सुरु आहे.
(४) सदर औषध खरेदीस प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. खरेदीबाबतीची पुढील आवश्यक कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मराठी भाषेतून वैद्यकीय शिक्षण देण्याच्या निर्णयाचा फेरविचार होणेबाबत

**(४५) ५४९९६ (२१-०१-२०२३). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मध्य प्रदेश शासनाच्या धर्तीवर महाराष्ट्र शासनाने स्थानिक म्हणजेच मराठी भाषेत वैद्यकीय शिक्षण दिले जाईल अशी घोषणा केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यार्थी सन २०२३ या शैक्षणिक वर्षापासून मराठी भाषेतून एमबीबीएस, आयुर्वेद, होमिओपॅथी, दंतचिकित्सा, नर्सिंग, फिजिओथेरपी यांसारखे अभ्यासक्रम शिकू शकणार असले तरी मराठी भाषा हा फक्त पर्याय असणार व बंधनकारक नसेल, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, असा निर्णय घेण्यापूर्वी शासनाने राज्याच्या विद्यार्थी व या क्षेत्रातील मान्यवरांचे यासंदर्भात अभिप्राय जाणून घेतलेले नाहीत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मराठी भाषेतून वैद्यकीय शिक्षण या निर्णयाचा शासन फेरविचार करणार आहे काय किंवा शासनाने केलेली पूर्वतयारीचे स्वरुप काय आहे?

**श्री. गिरीश महाजन (१३-०३-२०२३) :** (१) व (२) होय.
(३) आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमाच्या पाठ्यपुस्तकांचे मराठीत भाषांतर करण्याकरिता वैद्यकीय, दंत, आयुर्वेद, होमिओपॅथी आणि भौतिकोपचार अभ्यासक्रमाच्या तज्ञांची समिती गठित करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चाकूर (जि.लातूर)तालुक्यात अंगणवाडी व मिनी अंगणवाडी सेविकांना बैठक व प्रवास भत्त्यापासून देण्याबाबत

**(४६) ५५१२९ (२०-०१-२०२३). श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर), श्री.संजय बनसोडे (उदगीर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चाकूर (जि.लातूर)तालुक्यात अंगणवाडी व मिनी अंगणवाडी सेविका अश्या एकूण २३२ असून त्यांचेसमवेत १९४ मदतनीस कार्यरत असून त्यांना शासकीय कामानिमित्त पंचायत समिती, चाकूर येथे बैठकींसाठी महिन्यातून दोन वेळा तर प्राथमिक आरोग्य केंद्र येथे एकदा जावे लागते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासन नियमानुसार त्यांना या बैठकीसाठी भत्ता व प्रवासभाडे याकरिता सुमारे १०० ते १५० रुपये दिले जातात तथापि गेल्या तीन वर्षापासुन सदर अंगणवाडी सेविकांना अनुज्ञेय असणारा बैठक व प्रवास भत्ता मिळाला नसल्याचे दिनांक १६ नोव्हेंबर,२०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यांना देय भत्त्याअभावी स्वताःचा पैसा खर्च करावा लागत असल्याने त्यांना अनुज्ञेय असणारी भत्ताची रक्कम तातडीने मिळावी अशी मागणी प्रकल्प अधिकारी,एकात्मिक बालविकास,पंचायत समिती,चाकूर तसेच शासनाकडे वारंवार करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. मंगलप्रभात लोढा (३०-०१-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२), (३) व (४) अंशत: खरे आहे.
एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प कार्यालय चाकुर (जि. लातूर) या प्रकल्पाकरिता प्रवास भत्त्याकरिता सन २०२०-२१ मध्ये रुपये ७,०८,०००/-, सन २०२१-२२ मध्ये रुपये ६,००,०००/- इतका निधी उपलब्ध करुन दिला आहे. तसेच सन २०२२-२३ या वर्षाकरिता जिल्हा कार्यक्रम अधिकारी (महिला व बाल विकास), जिल्हा परिषद,लातूर यांना रुपये ८३.३७ लाख एवढा निधी वितरीत करण्यात आला आहे. त्यामधून सदर प्रकल्प कार्यालयास निधी वितरीत करण्याची कार्यवाही जिल्हा कार्यक्रम अधिकारी यांचेकडून करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कांतीसिंह नाना पाटील सर्वसाधारण जिल्हा रुग्णालय, (सिव्हील हॉस्पिटल) सातारा येथे लागणाऱ्या विविध उपकरण खरेदी साठी काढलेल्या निविदे बाबत**

**(४७) ५५४७३ (१८-०१-२०२३). श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कांतीसिंह नाना पाटील सर्वसाधारण जिल्हा रुग्णालय, (सिव्हील हॉस्पिटल) सातारा येथे लागणाऱ्या विविध उपकरणाची खरेदी करण्यासाठी जिल्हा शल्य चिकित्सक, सातारा यांनी निविदा काढल्या होत्या , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निविदा भरणाऱ्या काही ठेकेदारांना हेतू पुरस्पर बाद करण्यात आले अशी तक्रार काही ठेकेदारांनी केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निविदा रद्द करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास,सदर निविदा मंजूर करून रुग्णालयास लागणारी उपकरणे खरेदी करण्यात आली आहे काय,

(५) असल्यास, शासनाने या निविदा प्रक्रियेची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यामध्ये काय निष्पन्न झाले, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (०२-०३-२०२३) :** (१), (२) व (३) कोव्हिड-१९ या जागतिक महामारीच्या कालावधीत गंभीर, अतिगंभीर प्रादुर्भाव असलेल्या रुग्णांची संख्या अचानकपणे मोठ्या प्रमाणावर वाढत होती. सदर रुग्णांच्या जिविताच्या रक्षणासाठी प्रभावी उपचार व्हावेत म्हणून विविध उपकरणे, साहित्य सामुग्री यांची उपलब्धता तातडीने होण्याकरिता निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. दरम्यानच्या कालावधीमध्ये कोव्हिड-१९ चा प्रादुर्भाव लक्षणीयरीत्या कमी झाला व कोव्हिड-१९ ची लाट आली नाही. परिणामी संबंधित उपकरणे व साहित्य सामुग्री आवश्यकता न उरल्याने सदर खरेदी रद्द करण्यात आली होती. तसेच कोणत्याही पुरवठादारास कसल्याही रकमेची अदायगी करण्यात आली नाही.

(४) हे खरे नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर शहरातील अमरावती रोडवरील वाडी येथील वेल ट्रीट मल्टी सुपर स्पेशलिस्ट रुग्णालयाला अंतिरिम स्थगिती आदेश देणयाबाबत**

**(४८) ५५५८० (१८-०१-२०२३). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील अमरावती रोडवरील वाडी येथील वेल ट्रीट मल्टी सुपर स्पेशलिस्ट रुग्णालय हे बेकायदेशीर व रुग्णांच्या आरोग्याला घातक असल्यामुळे या रुग्णालयाचे नोंदणी प्रमाणपत्र रद्द करण्याचे आदेश पारित केले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वेल ट्रिट मल्टी स्पेशालिस्ट रुग्णालय यांच्या अपिलावरून मा. आरोग्य मंत्री यांनी या रुग्णालयाला अंतिरिम स्थगिती आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबबात शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार सदर रुग्णालयस पाठीशी घालणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (०१-०३-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

जिल्हा शल्य चिकित्सक, सर्वोपचार रुग्णालय, नागपूर यांनी दि. ०९/११/२०२२ रोजी सदर रुग्णालयाची नोंदणी रद्द करण्याबाबत आदेश पारित केले आहेत.

(२) हे खरे आहे.

(३) दि. ३०/११/२०२२ रोजी मा. मंत्री ( सार्वजनिक आरोग्य) यांनी प्रकरणाची सुनावणी घेतली. रुग्णालयाकडून केलेले अपिल फेटाळण्यात येवून जिल्हा शल्य चिकित्सक, सर्वोपचार रुग्णालय, नागपूर यांचे दि.०९/११/२०२२ रोजीचे रुग्णालय नोंदणी रद्द करण्याबाबतचे आदेश कायम केलेले आहेत. तसेच दि. २१/११/२०२२ रोजी दिलेले अंतरिम स्थगिती आदेश रद्द करण्यात आले आहेत.
(४) व ५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नळदुर्ग (ता. तुळजापूर जि. धाराशीव (उस्मानाबाद)) येथील उप जिल्हा रुग्णालयास ५० खाटांचे रुग्णालय व कर्मचारी निवासस्थान बांधकामास निधी उपलब्ध करणे बाबत.**

**(४९) ५५६२४ (१८-०१-२०२३). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नळदुर्ग (ता. तुळजापूर जि. धाराशीव (उस्मानाबाद)) येथील उप जिल्हा रुग्णालय ५० खाटांचे रुग्णालय व कर्मचारी निवासस्थान बांधकामास सुधारित प्रशासकीय मान्यता देऊन निधी उपलब्ध करणे बाबत दिनांक १७ नोव्हेबर,२०२२ रोजी तसेच तत्पूर्वी वारंवार शासनाकडे स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, येथील ५० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालायसाठी रु. २१.८२ कोटी इतक्या रकमेची मूळ प्रशासकीय मान्यता दिनांक २४ जून, २०१३ रोजीच्या शासन निर्णयान्वये देण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आय. पी. एच. एस. नॉर्म्सनुसार आरोग्य विभागाकडून प्राप्त नकाशे व त्यानुसार कामाच्या व्याप्ती मध्ये झालेली वाढ, शव विच्छेदन गृह व स्वतंत्र सार्वजनिक स्वछतागृह इमारत यासह आवश्यक वाढीव कामासाठी रु. ३१.९५ कोटी निधीच्या सुधारित अंदाज पत्रकास उच्चाधिकार सचिव समितीने सहमति दर्शविली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, येथील ५० खाटांच्या रुग्णालय व कर्मचारी निवासस्थान बांधकामास सुधारित प्रशासकीय मान्यता देऊन निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (०३-०२-२०२३) :** (१), (२) व (३) हे खरे आहे.
(४) सदर प्रस्तावास दिनांक ११.१०.२०२२ रोजीच्या उच्चस्तरीय सचिव समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली असून त्यानुसार सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कुडाळ (जि.सिंधुदुर्ग) येथील महिला व बाल रुग्णालयातील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(५०) ५५७४२ (१८-०१-२०२३). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात शासनाने पाच महिला व बाल रुग्णालय मंजुर केलेली असून त्यामध्ये कुडाळ (जि.सिंधुदुर्ग) येथे १०० खाटांचे महिला व बाल रुग्णालय असून या रुग्णालयासाठी श्रेणी १ ची ४ व श्रेणी २ची ६ तसेच अधिक्षक अशी १० पदे मंजुर असून यातील एम.बी.बी.एस. डॉक्टरांची ५ पदे आहेत तसेच परिचारिका वार्डबॉय आदी पदे रिक्त असल्याने औषधोपचारासाठी येणा-या महिला व बालकांना उपचारांवाचून वंचित रहावे लागते वा त्यांना अन्य ठिकाणी जावे लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी विविध संवर्गातील कर्मचारी यांची पदे रिक्त असल्याने तसेच अधिक्षक पदाचा कारभारही प्रभारींच्या हाती असून सद्य:स्थितीत या रुग्णालयात कंत्राटी पध्दतीने २५२ कर्मचारी कार्यरत असून येथे कायमस्वरुपी कर्मचा-यांची आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू रुग्णालयातल विविध संवर्गातील रिक्त पदे कायमस्वरुपी न भरण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) असल्यास, या रुग्णालयातील रिक्त पदे विनाविलंबाने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहे ?

**डॉ. तानाजी सावंत (०१-०३-२०२३) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

महिला व बाल रुग्णालय कुडाळ (जि. सिंधुदूर्ग) येथील वर्ग-१ ते वर्ग-४ ची नियमित मंजूर पदे एकूण ४२ आहेत. त्यापैकी १८ पदे भरलेली असून २४ पदे रिक्त आहेत. तर गट-क व गट-ड ची कंत्राटी तत्वावरील मंजूर पदे ५५ आहेत. त्यापैकी ५१ पदे भरलेली असुन ०४ पदे रिक्त आहेत.

वैद्यकिय अधिक्षक हे पद रिक्त असल्याने सदर पदाचा अतिरिक्त कार्यभार सेवाजेष्ठ वैद्यकीय अधिकारी यांच्याकडे देण्यात आलेला आहे.

महिला व बाल रुग्णालय कुडाळ येथील रुग्णांना उपलब्ध वैद्यकीय अधिकारी कर्मचारी यांच्यामार्फत रुग्णालयीन सेवा व औषधोपचार दिले जात असुन, रुग्ण आरोग्य सेवापासून वंचित राहणार नाहीत, याची दक्षता घेतली जाते.
(३) व (४) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ (वेतनस्तर एस-२३) मधील सरळसेवेच्या कोटयातील जिल्हा शल्य चिकित्सक संवर्ग व विशेषज्ञ संवर्गातील निवड झालेल्या उमेदवारांच्या शिफारशी आयोगा कडुन शासनास प्राप्त झालेल्या असुन, त्यामधुन सदर रुग्णालयासाठी वैद्यकीय अधिक्षकाचे पद भरण्यात येईल.

तसेच, मवैआसे गट-अ (वेतनस्तर एस-२०) नियमित वैद्यकीय अधिकारी तसेच सामान्य राज्य सेवेतील अधिकारी यांची पदभरतीची प्रक्रिया सुरु आहे. त्याचबरोबर गट-क व गट-ड संवर्गाची सरळसेवेच्या वाटयावरील रिक्त पदांची परिक्षा घेण्यासाठी एजन्सी निश्चित करण्याची कार्यवाही शासन स्तरावरुन सुरु आहे. त्यामधून सदर रुग्णालयासाठी आवश्यक अधिकारी कर्मचारी उपलब्ध करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.